दैनिक एकनिष्ठा आवाज सर्वसामान्यांचा

रविवार दि.१८ फेब्रुवारी २०२४



# शाळा आणि अंगणवाडीला बोलके करा: मुख्याध्यापक व अंगणवाडी सेविकांना सीईओ वाघमारे यांचा संदेश

दैनिक एकनिष्ठा । फुलचंद भगत । वाशिम

एक चित्र हे हजार शब्दाएवढे प्रभावी असतं त्यामुळे शब्दांपेक्षा चित्र पाहिलेले लक्षात राहतात. तसेच एखाद्या विषयाची वारंवार उजळणी (रिव्हिजन)केली तरी ते जास्तकाळ स्मरणात राहते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा आणि अंगणवाड्यांना चित्र आणि मजकुराच्या माध्यमातुन बोलके करा असा संदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी (दि.१६) दिला.





जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकुण ७७५ शाळा आहेत. त्यावर कार्यरत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची एकत्रित बैठक घेण्यासाठी एकही मोठे सभागृह वाशिमात उपलब्ध नसल्यामुळे आजपर्यंत संबंधितांची बैठकच झाली नव्हती. मात्र, विद्यमान सीईओ वाघमारे यांनी सभागृहाच्या भानगडीत न पडता थेट जिल्हा परिषदेच्या प्रांगणातच ७७५ मुख्याध्यापक, ७१ केंद्रप्रमुख, ६ गटशिक्षणाधिकारी आणि १४ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना बसवून मॅरेथॉन बैठक घेतली. तसेच या बैठकीनंतर लगेचच ९५८ अंगणवाडी सेविका,१७ पर्यवेक्षिका आणि ६ बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी जि. प. च्या सभागृहात संवाद साधला.

वाघमारे यांनी यावेळी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासंबंधी पाच महत्वाच्या मुद्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी पंचसुत्रीचे पालन करा. सर्व शाळा आणि अंगणवाडींच्या भिंती बोलक्या करा. शाळा-अंगणवाडींच्या पूर्ण भिंती, छत, स्वच्छतागृह, वॉल कंपाऊंडसह सर्व रंगवा, केवळ रंगवु नका तर संदेश आणि चित्राच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या. पुढे बोलतांना सीईओ वाघमारे म्हणाले, येणाऱ्या जुन महिन्यापूर्वी प्रत्येक शाळेत २०० झाडांची बाग तयार करा. नविन सत्रापासुन दर २ महिन्याला विद्यार्थ्यांची मुलभूत चाचणी घेतल जाणार असुन यामाध्यमातुन मुलांच्या ६ क्षमता तपासल्या जातील. त्यातून त्यांना इंग्रजी आणि मराठी वाचता येते का? बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार येतो का हे तपासले जाईल. महिन्यातून एकवेळ क्षमता चाचणी घेवून वर्गातील मुलांना त्या-त्या विषयात पारंगत होण्यासाठी काय करणे अपेक्षित आहे, यावर भर द्यायचा आहे. स्वत: शिक्षक व मुख्याध्यापकांनीच हे काम इमानेइतबारे करून मुलांचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वाघमारे यांनी केले.शिक्षक व मुख्याध्यापकांनी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुलभूत चाचणी, क्षमता चाचणी घेवून तसा अहवाल पालक अधिकाऱ्यांकडे सोपवावा. शाळांना मी अचानक भेटी देवून तपासणी करेल. त्यावेळी आकडेवारीत गोंधळ किंवा फरक आढळून आल्यास ही बाब खपवून घेतली जाणार नाही, असे सीईओ वैभव वाघमारे म्हणाले.जिल्हा परिषदेच्या शाळेतील शाळांचा शैक्षणिक दर्जा खालावला असुन ९वी- १०वीच्या बहुतांश विद्यार्थ्यांना साधे वाचता, लिहिता देखील येत नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून हे चित्र पालटण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापकांनी आता सतर्क व्हावे; अन्यथा संबंधितांची गय केली जाणार नाही, असा इशारा जिल्हा परिषदेचे विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिला. जे शिक्षक व मुख्याध्यापक चांगले काम करतील त्यांच्यासाठी माझ्याएवढा चांगला मित्र कोणी नसणार आणि जे कर्तव्यात कसूर करतील त्यांच्यासाठी माझ्याएवढा शत्रु कोणी नसेल असा थेट संदेशच त्यांनी बैठकीत दिला.

असाच संदेश सीईओ वाघमारे यांनी अंगणवाडी साविकांशी बोलतांना दिला. चांगले काम करणाऱ्या अंगणवाडी ताईसाठी मी भाऊ आणि मुलासारखा वागेन पण अंगणवाडीमधील लहान मुलांना घडवतांना त्यांच्या शारिरक व बौध्दिक क्षमता वाढविण्यात हलगर्जिपणा केल्यास संबंधित अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवेतुन कमी करण्यासही मागेपुढे पाहिले जाणार नसल्याचे ते म्हणाले.मुख्याध्यापकांच्या बैठकीला अति. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, शिक्षण अधिकारी राजेंद्र शिंदे, उप शिक्षण अधिकारी गजानन डाबेराव यांची उपस्थिती होती. उन्हाचा पारा वाढल्याने अंगणवाडी सेविकांची बैठक जि. प. च्या वसंतराव नाईक सभागृहात घेतली. जागेअभावी अंगणवाडी सेविकांना दाटीवाटीने बसावे लागले तर काहींना उभे रहावे लागले. सुरुवातीलाच त्यांच्याशी बोलतांना साऊंड व्यवस्था आणि बैठक व्यवस्थेच्या गैरसोयी बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी वाघमारे यांनी दिलगिरी व्यक्त केली. बैठकीला महिला बाल कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे, विस्तार अधिकारी अनिल उल्हामाले , बालविकास प्रकल्प अधिकारी प्रियंका गवळी, सारिका देशमुख, पंकज ननावरे, नितीन लुंगे, अमिता गिन्हे यांची उपस्थिती होती.

देशोन्नती

# शाळा आणि अंगणवाडींना बोलके करा

## जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांचे आवाहन

देशोन्नती वृत्तसंकलन...



**वाशिम** ■ एक चित्र हे हजार शब्दाएवढे प्रभावी असतं त्यामुळे शब्दांपेक्षा चित्र पाहिलेले लक्षात राहतात. तसेच एखाद्या विषयाची वारंवार उजळणी केली तरी ते जास्तकाळ स्मरणात राहते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा आणि अंगणवाड्यांना चित्र आणि मजकुराच्या माध्यमातुन बोलके करा असा संदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिला.

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकुण ७७५ शाळा आहेत. त्यावर कार्यरत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची एकत्रित बैठक घेण्यासाठी एकही मोठे सभागृह वाशिमात उपलब्ध नसल्यामुळे आजपर्यंत संबंधितांची बैठकच झाली नव्हती. मात्र, विद्यमान सीईओ वाघमारे यांनी सभागृहाच्या भानगडीत न पडता थेट जिल्हा परिषदेच्या प्रांगणातच ७७५ मुख्याध्यापक, ७१ केंद्रप्रमुख, ६ गटशिक्षणाधिकारी आणि १४ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना बसवून मॅरॅथॉन बैठक घेतली. तसेच या बैठकीनंतर लगेचच ९५८ अंगणवाडी सेविका,१७ पर्यवेक्षिका आणि ६ बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी जि. प. च्या सभागृहात संवाद साधला. वाघमारे यांनी यावेळी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासंबंधी पाच महत्वाच्या मुद्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी पंचसुत्रीचे पालन करा. सर्व शाळा आणि अंगणवाडींच्या भिंती बोलक्या करा. शाळा-अंगणवाडींच्या पूर्ण भिंती, छत, स्वच्छतागृह, वॉल कंपाऊडसह सर्व रंगवा, केवळ रंगवु नका तर संदेश आणि चित्राच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या. पुढे बोलतांना सीईओ वाघमारे म्हणाले, येणाऱ्या जुन महिन्यापूर्वी प्रत्येक शाळेत २०० झाडांची बाग तयार करा. नविन सत्रापासुन दर २ महिन्याला विद्यार्थ्यांची मुलभूत चाचणी घेतली जाणार असुन यामाध्यमातुन मुलांच्या ६ क्षमता तपासल्या जातील. त्यातून त्यांना इंग्रजी आणि मराठी वाचता येते का? बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार येतो का हे तपासले जाईल. महिन्यातून एकवेळ क्षमता चाचणी घेवून वर्गातील मुलांना त्या-त्या विषयात पारंगत होण्यासाठी काय करणे अपेक्षित आहे, यावर भर द्यायचा आहे.

स्वतः शिक्षक व मुख्याध्यापकांनीच हे काम इमानेइतबारे करून मुलांचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वाघमारे यांनी केले. यावेळी कामात दिरंगाई केल्यास त्यांच्यावर कारवाई देखिल केल्या जाईल असा इशारा देखिल त्यांनी यावेळी दिला. (जि.प्र.)

**आकडेवारीतील फरक खपवून घेतला जाणार नाहीः शिक्षक व मुख्याध्यापकांनी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुलभूत चाचणी, क्षमता चाचणी घेवून तसा अहवाल पालक अधिकाऱ्यांकडे सोपवावा. शाळांना मी अचानक भेटी देवून तपासणी करेल. त्यावेळी आकडेवारीत गोंधळ किंवा फरक आढळून आल्यास ही बाब खपवून घेतली जाणार नाही, असे सीईओ वैभव वाघमारे म्हणाले.**

Washim Edition
Feb 18, 2024 Page No. 1
Powered by : eReleGo.com

पुण्य नगरी

# शाळा आणि अंगणवाडीला बोलके करा : सीईओ वाघमारे

## शैक्षणिक दर्जा सुधारण्याचे दिले उद्दिष्ट

वाशीम, दि. १७ (प्रतिनिधी)

एक चित्र हे हजार शब्दाएवढे प्रभावी असतं त्यामुळे शब्दांपेक्षा चित्र पाहिलेले लक्षात राहतात. तसेच एखाद्या विषयाची वारंवार उजळणी (रिव्हिजन)केली तरी ते जास्तकाळ स्मरणात राहते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा आणि अंगणवाड्यांना चित्र आणि मजकुराच्या माध्यमातुन बोलके करा असा संदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी १६ रोजी दिला.

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकुण ७७५ शाळा असून त्यावर कार्यरत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची एकत्रित बैठक घेण्यासाठी एकही मोठे सभागृह वाशिमात उपलब्ध नसल्यामुळे आजपर्यंत संबंधितांची बैठकच झाली नव्हती. मात्र, विद्यमान सीईओ वाघमारे यांनी सभागृहाच्या भानगडीत न पडता थेट जिल्हा परिषदेच्या प्रांगणातच ७७५ मुख्याध्यापक, ७१ केंद्रप्रमुख, ६ गटशिक्षणाधिकारी आणि १४ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना बसवून मॅरेथॉन बैठक घेतली. तसेच या बैठकीनंतर लगेचच ९५८ अंगणवाडी सेविका,१७ पर्यवेक्षिका आणि ६ बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी जि. प. च्या सभागृहात संवाद साधला.वाघमारे यांनी यावेळी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासंबंधी पाच महत्वाच्या मुद्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी पंचसुत्रीचे पालन करुन सर्व शाळा आणि अंगणवाडींच्या भिंती बोलक्या करा. शाळा-अंगणवाडींच्या पूर्ण भिंती, छत, स्वच्छतागृह, वॉल कंपाऊडसह सर्व रंगवा, केवळ रंगवु नका तर संदेश आणि चित्राच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या. येणाऱ्या जुन महिन्यापूर्वी प्रत्येक शाळेत २०० झाडांची बाग तयार करा. नविन सत्रापासुन दर २ महिन्याला विद्यार्थ्यांची मुलभूत चाचणी घेतलीजाणार आहेत. यामाध्यमातुन मुलांच्या ६ क्षमता तपासल्या जातील. त्यातून त्यांना इंग्रजी आणि मराठी वाचता येते का? बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार येतो का हे तपासले जाईल. स्वतः शिक्षक व मुख्याध्यापकांनीच हे काम इमानेइतबारे करून मुलांचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वाघमारे यांनी केले. बैठकीला अति. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, शिक्षण अधिकारी राजेंद्र शिंदे, उप शिक्षणाधिकारी गजानन डाबेराव यांची उपस्थिती होती. बैठकीला महिला बाल कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे, विस्तार अधिकारी अनिल उल्हामाले , बालविकास प्रकल्प अधिकारी प्रियंका गवळी, सारिका देशमुख, पंकज ननावरे, नितीन लुंगे, अमिता गिऱ्हे यांची उपस्थिती होती.



### आकडेवारीतील फरक खपवून घेतला जाणार नाही

शिक्षक व मुख्याध्यापकांनी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुलभूत चाचणी, क्षमता चाचणी घेवून तसा अहवाल पालक अधिकाऱ्यांकडे सोपवावा. शाळांना मी अचानक भेटी देवून तपासणी करेल. त्यावेळी आकडेवारीत गोंधळ किंवा फरक आढळून आल्यास ही बाब खपवून घेतली जाणार नाही, असे सीईओ वैभव वाघमारे म्हणाले.

जनमाध्यम
अकोला | वाशिम | बुलडाणा
■ रविवार, १८ फेब्रुवारी २०२४
एक प्रतिष्ठित सवय
epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com

# शाळा व अंगणवाडीला बोलके करा

## मुख्याध्यापक व अंगणवाडी सेविकांना सीईओ वाघमारे यांचा संदेश; शैक्षणिक दर्जा सुधारण्याचे उद्दीष्ट

■ प्रतिनिधी | वाशिम ■

एक चित्र हे हजार शब्दाएवढे प्रभावी असतं त्यामुळे शब्दांपेक्षा चित्र पाहिलेले लक्षात राहतात. तसेच एखाद्या विषयाची वारंवार उजळणी (रिव्हिजन)केली तरी ते जास्तकाळ स्मरणात राहते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा आणि अंगणवाड्यांना चित्र आणि मजकुराच्या माध्यमातुन बोलके करा असा संदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दि. १६ फेब्रुवारी रोजी दिला.

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकुण ७७५ शाळा आहेत. त्यावर कार्यरत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची एकत्रित बैठक घेण्यासाठी एकही मोठे सभागृह वाशिमात उपलब्ध नसल्यामुळे आजपर्यंत संबंधितांची बैठकच झाली नव्हती. मात्र, विद्यमान सीईओ वाघमारे यांनी सभागृहाच्या भानगडीत न पडता थेट जिल्हा परिषदेच्या प्रांगणातच ७७५ मुख्याध्यापक, ७१ केंद्रप्रमुख, ६ गटशिक्षणाधिकारी आणि १४ शिक्षण विस्तार अधिका?यांना बसवून मॅरेथॉन बैठक घेतली. तसेच या बैठकीनंतर लगेचच ९५८ अंगणवाडी सेविका, १७ पर्यवेक्षिका आणि ६ बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी जि. प. च्या सभागृहात संवाद साधला.

वाघमारे यांनी यावेळी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासंबंधी पाच महत्वाच्या मुद्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, 'जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी पंचसुत्रीचे पालन करा. सर्व शाळा आणि अंगणवाडींच्या भिंती बोलक्या करा. शाळा-अंगणवाडींच्या पूर्ण भिंती, छत, स्वच्छतागृह, वॉल कंपाऊडसह सर्व रंगवा, केवळ रंगवु नका तर संदेश आणि चित्राच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या.' पुढे बोलतांना सीईओ वाघमारे म्हणाले, 'येणा?या जुन महिन्यापूर्वी प्रत्येक शाळेत २०० झाडांची बाग तयार करा. नविन सत्रापासुन दर २ महिन्याला विद्यार्थ्यांची मुलभूत चाचणी घेतली जाणार असुन यामाध्यमातुन मुलांच्या ६ क्षमता तपासल्या जातील. त्यातून त्यांना इंग्रजी आणि मराठी वाचता येते का? बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार येतो का हे तपासले जाईल.



महिन्यातून एकवेळ क्षमता चाचणी घेवून वर्गातील मुलांना त्या-त्या विषयात पारंगत होण्यासाठी काय करणे अपेक्षित आहे, यावर भर द्यायचा आहे. स्वत: शिक्षक व मुख्याध्यापकांनीच हे काम इमानेइतबारे करून मुलांचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वाघमारे यांनी केले. असाच संदेश सीईओ वाघमारे यांनी अंगणवाडी सेविकांशी बोलतांना दिला. चांगले काम करणा?या अंगणवाडी ताईंसाठी मी भाऊ आणि मुलासारखा वागेन पण अंगणवाडीमधील लहान मुलांना घडवतांना त्यांच्या शाररिक व बौध्दिक क्षमता वाढविण्यात हलगर्जिपणा केल्यास संबंधित अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवेतुन कमी करण्यासही मागेपुढे पाहिले जाणार नसल्याचे ते म्हणाले.

मुख्याध्यापकांच्या बैठकीला अति. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, शिक्षण अधिकारी राजेंद्र शिंदे, उपशिक्षण अधिकारी गजानन डाबेराव यांची उपस्थिती होती. उन्हाचा पारा वाढल्याने अंगणवाडी सेविकांची बैठक जि. प. च्या वसंतराव नाईक सभागृहात घेतली.

### आकडेवारीतील फरक खपवून घेतला जाणार नाही

शिक्षक व मुख्याध्यापकांनी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुलभूत चाचणी, क्षमता चाचणी घेवून तसा अहवाल पालक अधिकाऱ्यांकडे सोपवावा. शाळांना मी अचानक भेटी देवून तपासणी करेल. त्यावेळी आकडेवारीत गोंधळ किंवा फरक आढळून आल्यास ही बाब खपवून घेतली जाणार नाही, असे सीईओ वैभव वाघमारे म्हणाले.

### तुम्हाला कोण हवे, मित्र की शत्रु तुम्ही ठरवा

जिल्हा परिषदेच्या शाळेतील शाळांचा शैक्षणिक दर्जा खालावला असुन ९वी-१०वीच्या बहुतांश विद्यार्थ्यांना साधे वाचता, लिहिता देखील येत नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून हे चित्र पालटण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापकांनी आता सतर्क व्हावे; अन्यथा संबंधितांची गय केली जाणार नाही, असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिला. जे शिक्षक व मुख्याध्यापक चांगले काम करतील त्यांच्यासाठी माझ्याएवढा चांगला मित्र कोणी नसणार आणि जे कर्तव्यात कसूर करतील त्यांच्यासाठी माझ्याएवढा शत्रु कोणी नसेल असा थेट संदेशच त्यांनी बैठकीत दिला.

## महाडिबीटी पोर्टलवर शिष्यवृत्ती अर्ज सादर करण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत अनुसूचित जाती,इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत.शिष्यवृत्तीचे अर्ज भरण्यासाठी महाडिबीटी पोर्टल सुरू झाले असून शिष्यवृत्ती योजनेस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी महाडिबीटी पोर्टलवर अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, मॅट्रिकोत्तर शिक्षण फी परिक्षा फी प्रदाने,राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती,व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ति योजना, व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना विद्यावेतन या विविध योजना राबविण्यात येतात.

विद्यार्थ्यांना सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाचे अर्ज महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन भरण्यासाठी मागच्या ऑक्टोबर महिन्यापासून माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून पोर्टल कार्यान्वीत करण्यात आले आहे. २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षाचे व नूतनीकरणाचे अर्ज महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन भरण्यासाठी विद्यार्थ्यांना शासनाकडून मुदतवाढ देण्यात आली आहे.

अनुसूचित जाती,इतर मागास वर्ग,विशेष मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील योजनेस पात्र सर्व विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज भरावे. शिष्यवृत्ती योजनांसाठी जास्तीत जास्त प्रमाणात विद्यार्थ्यांची नोंदणी व अर्ज नोंदणीकरण मोठ्या प्रमाणात होण्यासाठी जिल्ह्यातील सर्व कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयात प्रवेशित योजनेस पात्र असलेल्या अनुसूचित जाती,इतर मागास वर्ग,विशेष मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे अर्ज महाडिबीटी संकेतस्थळावर विहीत मुदतीत भरून घेण्याची कार्यवाही करावी. याबाबत सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य व शिष्यवृत्ती काम पाहणाऱ्या कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांना याबाबत अवगत करावे.

## गिरोली येथे शिवजयंतीनिमित्त शिवव्याख्याते युवराज राठोड करणार शिवविचारांचा जागर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

छत्रपती शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो. छ. शिवरायाच्या पराक्रमाचा जनतेच्या काळजावर कोरलेल्या इतिहासाबद्दल लोकांना जागरूक करता यावे तसेच शिस्त , नियोजन , राष्ट्रवाद , बलिदान , सहिष्णुता , आपुलकी , प्रेरणा , विचार या सगळ्यांनी युक्त छ. शिवरायांचे चरित्र लोकांना माहिती व्हावे या उद्देशाने जिल्ह्यातील मानोरा तालुक्यातील गिरोली येथे दिनांक १९ फेब्रुवारी रोजी सायं. ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त ' शिवराय मनामनात , शिवजयंती घराघरात ' याप्रमाणे भव्य शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

' छत्रपती शिवराय आणि आजचा महाराष्ट्र ' या विषयावर महाराष्ट्राची बुलंद तोफ , प्रसिद्ध शिवव्याख्याते युवराज राठोड यांच्या व्याख्यानाचे आयोजन गिरोली येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. तरी या प्रबोधनपर व्याख्यानाला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन गिरोली येथील सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## चुकीने खात्यात आलेले ५० हजार केले परत; योगेश मुंढरे यांनी जागवला माणूसकीचा परिचय

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

घाई घाईत पैसे पाठवत असताना चुकीने ते दुसऱ्याच्या खात्यात गेले असताना ते पूर्ण पैसे एक रकमी परत केल्याची घटना मालेगाव येथे घडली योगेश मुंढरे यांच्या खात्यात आलेले पूर्ण पैसे त्यांनी ताबडतोब परत देऊन या जगात माणूसकी जिवंत असल्याचा परिचय दिला.

मानोरा तहसील कार्यालयात कार्यरत असलेले व मंगरूळनाथ येथील रहेवासी असलेले अजय खिराडे यांना १५ फेब्रूवारी ला त्यांच्या मित्राला फोन पे वरून ५०००० पाठवायचे होते पैसे पाठवत असतांना नजर चुकीने मोबाईल नंबर मधील एक अक्षर चुकीचा पडल्या मुळे ५०००० येवढी मोठी रक्कम अपरीचीत व्यक्तीच्या नंबर गेली असता त्या नंबर वर अजय खिराडे यांणी कॉल केला असता तो मालेगांव येथील पत्रकार योगेश मुंढरे यांनी उचला व त्यांना सांगितले दोन तासा पासुन तुमच्या कॉल ची वाट बघत होतो असे सांगितले अजय खीराडे बोलण्या अगोदर योगेश मुंढरे यांनी त्यांना सांगीतले तुमचे ५०००० सुरक्षित आहेत व या पुर्वी सुद्धा तुमचे १० डिसेबर ला १००० रु सुध्दा माझ्या खात्यात आलेले आहेत तुम्ही निच्छीत रहा तुमचे पैसे तुम्हाला परत मिळतील असे बोलले व त्यांना त्यांच्या खात्यावर पैसे २ वेळा पाठवले असता पेमेन्ट फेल होत होते त्यांना सांगीतले पेमेन्ट सेन्ट होत नाहीत त्यांच्या समाधाना करीता मी त्यांना मगरूळनाथ तहसील कार्यालया मध्ये माझे भाऊजी दिलीप रावपलाई आहेत यांना भेटायला सांगितले व दुसऱ्या दिवशी दि. १६ फेब्रूवारीला मालेगांव येथे बोलवून मालेगांव येथील पोस्ट ऑफीस मध्ये असलेल्या खात्या मधुन ५१०००० रु काढून पोस्ट ऑफीस मधील कॅशीयर सुनील गायकवाड व मंगरूळनाथ येथील अजय खिराडे यांचे मित्र मोन्टू ऐवले यांच्या समक्ष अजय खिराडे यांना दिली त्यावेळी पोस्ट ऑफिस चे कॅशियर सुनील गायकवाड .डॉ. एम डी विजय मुंदडा तसेच केमिस्ट सुर्वे केमिस्ट गोवर्धन ढोबळे उपस्थित होते त्यांनी सध्या ही मानुस्की जीवंत आहे असी स्तुती करीत योगेश मुंढरे यांना पुष्प गुच्छ देऊन सत्कार केला आणि त्यांचे आभार मानले.

## मालेगावात शंकरपटाचे आयोजन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

श्री गुणवंत महाराज संस्थान भेरा रोड मालेगाव च्या वतीने १७ व १८ फेब्रुवारी रोजी शंकर पटाचे आयोजन करण्यात आले आहे भेरा रस्त्यावरील गाभणे यांच्या शेता मध्ये हा शंकरपट आयोजित करण्यात आला असुन एकूण २ लाख ५१ हजार रुपयांची बक्षिसे ठेवण्यात आली आहेत या शंकरपटाचे उद्घाटन भाजपाचे रिसोड मालेगाव विधानसभा मतदार संघाचे प्रमुख ॲड नकुलदादा देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषी उत्पन्न गजाननराव देवळे राहणार आहेत. समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून प पू पवन महाराज, मधुकर काळे, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे विभागीय अध्यक्ष प्रा अरविंद गाभणे, बुलडाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष शैलेश सावजी शिवसेना जिल्हा उपप्रमुख प्रदीप पाटिल मोरे, माजी जि प सदस्य चंदू जाधव, जि प सदस्य सुनील चंदनशिव, सामाजिक कार्यकर्ते प्रवीण अवताडे, किशोर शिंदे, अमोल शिंदे बजरंग दलाचे जिल्हा अध्यक्ष आशीष बळी, शिवसेनेचे मालेगाव शहर अध्यक्ष देवा राऊत, योगेश सोनटक्के, बाजार समितीचे माजी सभापती पहारे, धनंजय राऊत, काशिनाथ संदिप कोपुरवार गणेश काटेकर, ज्ञानेश्वर काटेकर, गोरख बोरकर, कृष्णाभाऊ काठोले, अशोकराव कुटे नितीन भालेराव धनंजय माने, सेवाराम आडे, मधुकर खुने आदी उपस्थित राहणार आहेत. या शंकर पटाची बक्षिसे रिसोड मालेगाव विधानसभा मतदार संघाचे भाजपाचे प्रमुख नकुल देशमुख, रामभाऊ काटेकर, विजय अंभोरे, सारंग माळेकर, अभिषेक मुंदडा, संतोष भालेरा, व्दामोदर इंगोले, सुभाष काटेकर, पप्पू कुटे अभिषेक, देवकते, आत्माराम नवघरे, राम मोहळे नितिन बळी डॉ तारे, रामा टेम्भरे, सीताराम काटेकर, दिलीप गट्टाणी, गोपाल आढाव ओम खुरसडे,काटेकर, आरती ज्वेलर्स, शिव कलेक्शन कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती, गणेश उंडाळ, रा कॉ चे शहर अध्यक्ष अरुण बळी स्व गजानन कुटे स्मृती प्रित्यर्थ, नगरसेवक किशोर महाकाळ, डॉ राजेश दळवे, शिवा पाटील, भेरा चे उपसरपंच वैभव देशमुख, जगदीश राव देशमुख आदींनी दिले आहेत.

## ईव्हीएम विरोधी देशव्यापी हस्ताक्षर अभियान आंदोलनाला प्रतिसाद



■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय युवा मोर्चाच्या वतीने शुक्रवार, १६ फेब्रुवारीला स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात ईव्हीएम विरोधी देशव्यापी हस्ताक्षर अभियान आंदोलन राबविण्यात आले. या आंदोलनाला विविध स्तरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी नागरीकांनी हस्ताक्षर बॅनरवर आपल्या सह्या करुन ईव्हीएम विरोधी अभियानाला आपला पाठींबा दिला. याबाबत भारतीय युवा मोर्चाच्या वतीने प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात नमूद आहे की, भारत देशातील ३२ राज्यांमध्ये ५६७ जिल्ह्यांमध्ये भारतीय युवा मोर्चा हे सामाजिक (एससी, एसटी, ओबीसी, व्हीजेनटी, अल्पसंख्यांक) ८५ टक्के बहुजन समाजाची संघटना म्हणून नावारूपात आलेली आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या भारत देशात इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीन म्हणजे ई व्ही एम वापर २००४ पासून सक्रिय भारत देशात सुरू आहे त्याची इलेक्ट्रॉनिक वोटिंग मशीनच्या विरोधात भारतीय युवा मोर्चाने पुकारलेल्या देशव्यापी हस्ताक्षर अभियान आंदोलनाला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी बहूजन मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय युवा सचिव सौरभ गायकवाड, राज्य उपाध्यक्ष डॉ. रवि जाधव, आत्माराम खडसे, भारत मुक्ती मोर्चा जिल्हाध्यक्ष संजय ढळे, बहूजन मुक्ती पार्टी युवा जिल्हाध्यक्ष शाम खिल्लारे, राम खिल्लारे, धम्मदास वाकोडे, प्रेमानंद अरखराव, आदर्श मोरे आदींनी परिश्रम घेतले.

## गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन

**कारंजा :** विदर्भात पोहरादेवी हे गाव बंजारा समाजाची काशी समजल्या जाणाऱ्या पवित्र अशा श्रीक्षेत्र पोहरादेवी या तीर्थ क्षेत्राच्या ठिकाणी बंजारा समाजाचे संत श्री सेवालाल महाराज यांचे समाधी स्थळ असून येथे श्रद्धालू लाखोच्या संख्येने देश विदेश राज्य परराज्यातून दर्शनार्थ येवून नतमस्तक होतात व तीर्थ क्षेत्रालगतच यवतमाळ व नांदेड या प्रस्तावित नूतन लोहमार्गाचे काम सुरु असून श्री क्षेत्र पोहरादेवी जवळच मौजे सावळी हे नुतन रेल्वे स्थानक सुद्धा प्रस्तवीत केले आहे.

### जाहीरनामा

सर्वत्र जनतेला याव्दारे कळविण्यात अर्जदार महादेव पुंडलिक तुपकरी रा. किन्हीराजा ता. मालेगांव जि. वाशिम यांनी त्यांचे स्वताः / वडील / आई / आजी / आजोबा /मुलगा/मुलगी आई नामे पुंडलिक नागाआप्पा तुपकरी यांचा मृत्यु दिनांक २३/०१/१९८३ रोजी ठिकाण - किन्हीराजा ता.मालेगांव जि. वाशिम येथे झाला आहे. याबाबत जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) नुसार त्यांचे मृत्युची नोंद गैरअर्जदार सचिव, ग्रामपंचायत किन्हीराजा यांचे जन्म मृत्यु नोंदणी रजीस्टरमध्ये घेण्याकरीता आदेशीत करणे बाबत अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

करीता अर्जदार महोदव पुंडलिक तुपकरी रा. किन्हीराजा ता. मालेगांव जि. वाशिम यांनी त्यांचे स्वतः/वडील/आई/आजी/आजोबा/मुलगा/मुलगी नामे पुंडलिक नागाआप्पा तुपकरीं यांचा मृत्यु दिनांक २३/०१/१९८३ रोजी झाला आहे. याबाबत जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) नुसार त्यांचे मृत्युची नोंद सचिव, ग्रामपंचायत किन्हीराजा ता. मालेगांव जि. वाशिम यांचे जन्म मृत्यु नोंदणी रजीस्टरमध्ये करणे बाबतचे प्रकरणात कोणाचे काही हरकती अथवा आक्षेप असल्यास जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसाचे आत या कार्यालयात कार्यालयात सादर कराव्यात मुदत बाहय हरकतीचा/आक्षेपांचा विचार केला जाणार नाही.

दिनांक- ०५/०१/२०२४

(शिक्का) **तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, मालेगांव**

### जाहिर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), मालेगांव, जि. वाशिम यांचे न्यायालयात ०२**

सिव्हील एम. ए. नं.४६/२०२४ प्रोसेस नं.५९३/२०२४

चौ.ता. ३०/०३/२०२४ दिनांक : १४/०२/२०२४

**अर्जदार :** १. दत्तात्रय परशराम डिघोळे, वय अं. ४१ वर्षे, २. परशराम नारायण डिघोळे, वय अं. ७० वर्षे, ३. श्रीमती दुर्गा पुरूषोत्तम डिघोळे, वय अं. ३६ वर्षे, ४. आशिष पुरूषोत्तम डिघोळे, वय अं. १२ वर्षे, (अ.पा.क. आई अर्जदार क. ३ दुर्गा पुरूषोत्तम डिघोळे) ५. साक्षी पुरूषोत्तम डिघोळे, वय अं. २० वर्षे, ६. संध्या रविंद्र नागरे, वय अं. ३६ वर्षे, अर्जदार क्र.१ ते ५ रा. किन्हीराजा, ता. मालेगांव, जि. वाशिम. अर्जदार क्र.६ रा. मु.पो. राजनखेड, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला.

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत नामे रत्नमालाबाई परशराम डिघोळे, रा. किन्हीराजा, ता. मालेगांव जि. वाशिम हयांचा मृत्यु दि. २३/१२/२०२३ रोजी झालेला असून मयताचे अर्जदार १ ते ६ हेच वारस असून अर्जदाराने मयताचे वारस म्हणुन नोंद करण्याकरिता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०२ नुसार कायदेशीर वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. या व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

याअर्थी सदर अर्जा संबंधी कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौकशी तारीख ३०/०३/२०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाचे आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा निर्देशीत केलेल्या वकिला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायद्यानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक १४/०२/२०१४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

(शिक्का) **सहाय्यक अधिक्षक** दिवाणी न्यायालय (क-स्तर), मालेगांव

## दापुरी ते गोवर्धन रस्त्यावर खड्ड्याचे साम्राज्य

### आठ किलोमीटरच्या रस्त्याच्या दुरावस्थेकडे कोण लक्ष देणार?; सार्वजनिक बांधकाम विभागासह लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष



■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील दापुरी, वाघी खुर्द ते गोवर्धन या आठ किलोमीटर रस्त्याची प्रचंड दुरावस्था झाली असून रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. या रस्त्याने दुचाकी, तीनचाकी, चारचाकी वाहने तर सोडाच पायी चालणेही मुश्किल झाले आहे. या रस्त्यावर दररोज लहान मोठे अपघात होत असून अनेक वर्षांपासून या रस्त्यावर अपघातांची मालिका सुरु आहे. लवकरच या रस्त्याचे काम सुरू न झाल्यास परिसरातील नागरिक तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याच्या पवित्र्यात दिसत आहेत. या खराब रस्त्याकडे सार्वजनिक बांधकाम विभागासह या विभागातील लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप जनता करीत आहेत.

#### नागरिक आंदोलनाच्या पावित्र्यात

वाशीमवरून मेहकरला जाण्यासाठी प्रवाश्यांना रिठद मार्गे येवता दापुरी वाघी खुर्द गोवर्धन मांगूळ सोनाटी असा हा मधला व सरळ मार्ग आहे. पूर्वी या मार्गाने सुरु असलेल्या वाशीम ते मेहकर एसटी बसला प्रवाश्यांचा चांगला प्रतिसाद होता. मात्र, खराब रस्त्यामुळे ही बस सेवा बंद करण्यात आल्याचे सांगण्यात येते. दापुरी वाघी खुर्द गोवर्धन हा आठ किलोमीटरचा रस्ता जागोजागी खचला असून अनेक ठिकाणी गिट्टी उखडली आहे. रस्त्यावरील मोठ्या खड्ड्यामुळे वाघीवरून गोवर्धनला ये जा करणारे शाळकरी मुले, मुली, दवाखान्यात जाणारे रुग्ण, कामानिमित्त पायी जाणारे नागरिक आदींसाठी हा रस्ता आता 'मौत का कुव्वा' बनला आहे. या नादुरुस्त रस्त्यावरून वाहन चालविणे तर सोडाच पायी चालणेही मोठे जिकिरीचे झाले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या गंभीर समस्येकडे तात्काळ लक्ष घालून या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण तात्काळ करावे, तसेच जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधिंनी सुद्धा या गंभीर बाबीकडे लक्ष द्यावे अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

# शाळा आणि अंगणवाडीला बोलके करा

## मुख्याध्यापक व अंगणवाडी सेविकांना सीईओंचे आवाहन

**वाशीम, ता.१७ :** एक चित्र हे हजार शब्दांएवढे प्रभावी असते, त्यामुळे शब्दांपेक्षा चित्र लक्षात राहतात. तसेच एखाद्या विषयाची वारंवार उजळणी केली तरी ते जास्त काळ स्मरणात राहते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा आणि अंगणवाड्यांना चित्र आणि मजकुराच्या माध्यमातून बोलके करा, असा संदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी ता.१६ रोजी दिला.

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकूण ७७५ शाळा आहेत. त्यावर कार्यरत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची एकत्रित बैठक घेण्यासाठी एकही मोठे सभागृह वाशीममध्ये उपलब्ध नसल्यामुळे आजपर्यंत संबंधितांची बैठकच झाली नव्हती. मात्र, विद्यमान सीईओ वाघमारे यांनी सभागृहाच्या भानगडीत न पडता थेट



**वाशीम :** कार्यक्रमात बोलताना मान्यवर.

जिल्हा परिषदेच्या प्रांगणातच ७७५ मुख्याध्यापक, ७१ केंद्रप्रमुख, ६ गटशिक्षणाधिकारी आणि १४ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना बसवून मॅरेथॉन बैठक घेतली.

या बैठकीनंतर लगेचच ९५८ अंगणवाडी सेविका, १७ पर्यवेक्षिका आणि ६ बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी जि. प. च्या सभागृहात संवाद साधला.

### आकडेवारीतील फरक खपवून घेतला जाणार नाही

शिक्षक व मुख्याध्यापकांनी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुलभूत चाचणी, क्षमता चाचणी घेऊन तसा अहवाल पालक अधिकाऱ्यांकडे सोपवावा. शाळांना मी अचानक भेटी देऊन तपासणी करेन. त्यावेळी आकडेवारीत गोंधळ किंवा फरक आढळून आल्यास ही बाब खपवून घेतली जाणार नाही, असे सीईओ वैभव वाघमारे म्हणाले.

वाघमारे यांनी यावेळी शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासंबंधी पाच महत्त्वाच्या मुद्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, "जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी पंचसुत्रीचे पालन करा. शाळा-अंगणवाडीच्या पूर्ण भिंती, छत, स्वच्छतागृह, वॉल कंपाऊडसह सर्व रंगवा, केवळ रंगवू नका तर संदेश आणि चित्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या." पुढे बोलताना सीईओ वाघमारे म्हणाले, येत्या जून महिन्यापूर्वी प्रत्येक शाळेत २०० झाडांची बाग तयार करा. नविन सत्रापासून दर २ महिन्यात विद्यार्थ्यांची मुलभूत चाचणी घेतली जाणार असून यामाध्यमातुन मुलांच्या ६ क्षमता तपासल्या जातील. त्यातून त्यांना इंग्रजी आणि मराठी वाचता येते का? बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार येतो का? हे तपासले जाईल. महिन्यातून एकवेळ क्षमता चाचणी घेऊन वर्गातील मुलांना त्या-त्या विषयात पारंगत होण्यासाठी काय करणे अपेक्षित आहे, यावर भर द्यायचा आहे. स्वत: शिक्षक व मुख्याध्यापकांनीच हे काम करून मुलांचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वाघमारे यांनी केले.

मनसत प्रवेश करण्यात आली.

कार्यकर्ते उपस्थित होते.



# शाळा व अंगणवाडीला बोलके करा

## मुख्याध्यापक व अंगणवाडी सेविकांना सीईओ वाघमारे यांचा संदेश; शैक्षणिक दर्जा सुधारण्याचे उद्दीष्ट

■ प्रतिनिधी | वाशिम ■

एक चित्र हे हजार शब्दाएवढे प्रभावी असतं त्यामुळे शब्दांपेक्षा चित्र पाहिलेले लक्षात राहतात. तसेच एखाद्या विषयाची वारंवार उजळणी (रिव्हिजन)केली तरी ते जास्तकाळ स्मरणात राहते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा आणि अंगणवाड्यांना चित्र आणि मजकुराच्या माध्यमातुन बोलके करा असा संदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दि. १६ फेब्रुवारी रोजी दिला.

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकुण ७७५ शाळा आहेत. त्यावर कार्यरत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची एकत्रित बैठक घेण्यासाठी एकही मोठे सभागृह वाशिमात उपलब्ध नसल्यामुळे आजपर्यंत संबंधितांची बैठकच झाली नव्हती. मात्र, विद्यमान सीईओ वाघमारे यांनी सभागृहाच्या भानगडीत न पडता थेट जिल्हा परिषदेच्या प्रांगणातच ७७५ मुख्याध्यापक, ७१ केंद्रप्रमुख, ६ गटशिक्षणाधिकारी आणि १४ शिक्षण विस्तार अधिका?्यांना बसवून मॅरेथॉन बैठक घेतली. तसेच या बैठकीनंतर लगेचच ९५८ अंगणवाडी सेविका, १७ पर्यवेक्षिका आणि ६ बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी जि. प. च्या सभागृहात संवाद साधला.

वाघमारे यांनी यावेळी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासंबंधी पाच महत्वाच्या मुद्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, 'जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी पंचसुत्रीचे पालन करा. सर्व शाळा आणि अंगणवाडींच्या भिंती बोलक्या करा. शाळा-अंगणवाडींच्या पूर्ण भिंती, छत, स्वच्छतागृह, वॉल कंपाऊंडसह सर्व रंगवा, केवळ रंगवु नका तर संदेश आणि चित्राच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या.' पुढे बोलतांना सीईओ वाघमारे म्हणाले, 'येणा?्या जुन महिन्यापूर्वी प्रत्येक शाळेत २०० झाडांची बाग तयार करा. नविन सत्रापासुन दर २ महिन्याला विद्यार्थ्यांची मुलभूत चाचणी घेतली जाणार असुन यामाध्यमातुन मुलांच्या ६ क्षमता तपासल्या जातील. त्यातून त्यांना इंग्रजी आणि मराठी वाचता येते का? बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार येतो का हे तपासले जाईल.



महिन्यातून एकवेळ क्षमता चाचणी घेवून वर्गातील मुलांना त्या-त्या विषयात पारंगत होण्यासाठीकाय करणे अपेक्षित आहे, यावर भर द्यायचा आहे. स्वत: शिक्षक व मुख्याध्यापकांनीच हे काम इमानेइतबारे करून मुलांचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वाघमारे यांनी केले. असाच संदेश सीईओ वाघमारे यांनी अंगणवाडी सेविकांशी बोलतांना दिला. चांगले काम करणा?्या अंगणवाडी ताईसाठी मी भाऊ आणि मुलासारखा वागेन पण अंगणवाडीमधील लहान मुलांना घडवतांना त्यांच्या शारिरिक व बौध्दिक क्षमता वाढविण्यात हलगर्जिपणा केल्यास संबंधित अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवेतुन कमी करण्यासही मागेपुढे पाहिले जाणार नसल्याचे ते म्हणाले.

मुख्याध्यापकांच्या बैठकीला अति. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, शिक्षण अधिकारी राजेंद्र शिंदे, उपशिक्षण अधिकारी गजानन डाबेराव यांची उपस्थिती होती. उन्हाचा पारा वाढल्याने अंगणवाडी सेविकांची बैठक जि. प. च्या वसंतराव नाईक सभागृहात घेतली.

### आकडेवारीतील फरक खपवून घेतला जाणार नाही

शिक्षक व मुख्याध्यापकांनी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुलभूत चाचणी, क्षमता चाचणी घेवून तसा अहवाल पालक अधिकाऱ्यांकडे सोपवावा. शाळांना मी अचानक भेटी देवून तपासणी करेल. त्यावेळी आकडेवारीत गोंधळ किंवा फरक आढळून आल्यास ही बाब खपवून घेतली जाणार नाही, असे सीईओ वैभव वाघमारे म्हणाले.

### तुम्हाला कोण हवे, मित्र की शत्रु तुम्ही ठरवा

जिल्हा परिषदेच्या शाळेतील शाळांचा शैक्षणिक दर्जा खालावला असुन ९वी-१०वीच्या बहुतांश विद्यार्थ्यांना साधे वाचता, लिहिता देखील येत नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून हे चित्र पालटण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापकांनी आता सतर्क व्हावे; अन्यथा संबंधितांची गय केली जाणार नाही, असा इशारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिला. जे शिक्षक व मुख्याध्यापक चांगले काम करतील त्यांच्यासाठी माझ्याएवढा चांगला मित्र कोणी नसणार आणि जे कर्तव्यात कसूर करतील त्यांच्यासाठी माझ्याएवढा शत्रु कोणी नसेल असा थेट संदेशच त्यांनी बैठकीत दिला.

दैनिक भारत संग्राम
18 Feb 2024

### मुख्याध्यापक व अंगणवाडी सेविकांना सीईओ वाघमारे यांचा संदेश, शैक्षणिक दर्जा सुधारण्याचे उद्दीष्ट

# शाळा आणि अंगणवाडीला बोलके करा





**दै. भारत संग्राम, वृत्तसेवा**

**वाशिम** : दि. १७/2/24 एक चित्र हे हजार शब्दाएवढे प्रभावी असतं त्यामुळे शब्दांपेक्षा चित्र पाहिलेले लक्षात राहतात. तसेच एखाद्या विषयाची वारंवार उजळणी (रिव्हिजन)केली तरी ते जास्तकाळ स्मरणात राहते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा आणि अंगणवाड्यांना चित्र आणि मजकुराच्या माध्यमातुन बोलके करा असा संदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी (दि.१६) दिला. जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकुण ७७५ शाळा आहेत. त्यावर कार्यरत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची एकत्रित बैठक घेण्यासाठी एकही मोठे सभागृह वाशिमात उपलब्ध नसल्यामुळे आजपर्यंत संबंधितांची बैठकच झाली नव्हती. मात्र, विद्यमान सीईओ वाघमारे यांनी सभागृहाच्या भानगडीत न पडता थेट जिल्हा परिषदेच्या प्रांगणातच ७७५ मुख्याध्यापक, ७१ केंद्रप्रमुख, ६ गटशिक्षणाधिकारी आणि १४ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना बसवून मॅरेथॉन बैठक घेतली. तसेच या बैठकीनंतर लगेचच 958 अंगणवाडी सेविका, 17 पर्यवेक्षिका आणि 6 बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी जि. प. च्या सभागृहात संवाद साधला.

वाघमारे यांनी यावेळी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासंबंधी पाच महत्वाच्या मुद्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, “जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी पंचसुत्रीचे पालन करा. सर्व शाळा आणि अंगणवाडींच्या भिंती बोलक्या करा. शाळा-अंगणवाडींच्या पूर्ण भिंती, छत, स्वच्छतागृह, वॉल कंपाऊडसह सर्व रंगवा, केवळ रंगवु नका तर संदेश आणि चित्राच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या.” पुढे बोलतांना सीईओ वाघमारे म्हणाले, “येणाऱ्या जुन महिन्यापूर्वी प्रत्येक शाळेत २०० झाडांची बाग तयार करा. नविन सत्रापासुन दर २ महिन्याला विद्यार्थ्यांची मुलभूत चाचणी घेतल जाणार असुन यामाध्यमातुन मुलांच्या ६ क्षमता तपासल्या जातील. त्यातून त्यांना इंग्रजी आणि मराठी वाचता येते का? बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार येतो का हे तपासले जाईल. महिन्यातून एकवेळ क्षमता चाचणी घेवून वर्गातील मुलांना त्या-त्या विषयात पारंगत होण्यासाठी काय करणे अपेक्षित आहे, यावर भर द्यायचा आहे. स्वत: शिक्षक व मुख्याध्यापकांनीच हे काम इमानेइतबारे करून मुलांचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वाघमारे यांनी केले.

## आकडेवारीतील फरक खपवून घेतला जाणार नाही:

- शिक्षक व मुख्याध्यापकांनी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुलभूत चाचणी, क्षमता चाचणी घेवून तसा अहवाल पालक अधिका *यांकडे सोपवावा. शाळांना मी अचानक भेटी देवून तपासणी करेल. त्यावेळी आकडेवारीत गोंधळ किंवा फरक आढळून आल्यास ही बाब खपवून घेतली जाणार नाही, असे सीईओ वैभव वाघमारे म्हणाले.

## तुम्हाला कोण हवे, मित्र की शत्रु तुम्ही ठरवा

- जिल्हा परिषदेच्या शाळेतील शाळांचा शैक्षणिक दर्जा खालावला असुन ९वी- १०वीच्या बहुतांश विद्यार्थ्यांना साधे वाचता, लिहिता देखील येत नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून हे चित्र पालटण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापकांनी आता सतर्क व्हावे; अन्यथा संबंधितांची गय केली जाणार नाही, असा इशारा जिल्हा परिषदेचे विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिला. जे शिक्षक व मुख्याध्यापक चांगले काम करतील त्यांच्यासाठी माझ्याएवढा चांगला मित्र कोणी नसणार आणि जे कर्तव्यात कसूर करतील त्यांच्यासाठी माझ्याएवढा शत्रु कोणी नसेल असा थेट संदेशच त्यांनी बैठकीत दिला.
- असाच संदेश सीईओ वाघमारे यांनी अंगणवाडी साविकांशी बोलतांना दिला. चांगले काम करणा *या अंगणवाडी ताईंसाठी मी भाऊ आणि मुलासारखा वागेन पण अंगणवाडीमधील लहान मुलांना घडवतांना त्यांच्या शाररिक व बौध्दिक क्षमता वाढविण्यात हलगर्जिपणा केल्यास संबंधित अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवेतुन कमी करण्यासही मागेपुढे पाहिले जाणार नसल्याचे ते म्हणाले.

मुख्याध्यापकांच्या बैठकीला अति. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, शिक्षण अधिकारी राजेंद्र शिंदे, उप शिक्षण अधिकारी गजानन डाबेराव यांची उपस्थिती होती. उन्हाचा पारा वाढल्याने अंगणवाडी सेविकांची बैठक जि. प. च्या वसंतराव नाईक सभागृहात घेतली. जागेअभावी अंगणवाडी सेविकांना दाटीवाटीने बसावे लागले तर काहींना उभे रहावे लागले. सुरुवातीलाच त्यांच्याशी बोलतांना साऊंड व्यवस्था आणि बैठक व्यवस्थेच्या गैरसोयी बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी वाघमारे यांनी दिलगिरी व्यक्त केली. बैठकीला महिला बाल कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे, विस्तार अधिकारी अनिल उल्हामाले , बालविकास प्रकल्प अधिकारी प्रियंका गवळी, सारिका देशमुख, पंकज ननावरे, नितीन लुंगे, अमिता गि *हे यांची उपस्थिती होती.

बहुजनांच्या न्याय हक्काचं शस्त्र...

# सम्राट टाईम्स

मुख्य संपादक : विनोद ज्ञानदेव तायडे 9563645555 8888277765

# शाळा आणि अंगणवाडीला बोलके करा मुख्याध्यापक व अंगणवाडी सेविकांना सीईओ वाघमारे यांचा संदेश

## शैक्षणिक दर्जा सुधारण्याचे उद्दीष्ट

वाशिम @ एक चित्र हे हजार शब्दाएवढे प्रभावी असतं त्यामुळे शब्दांपेक्षा चित्र पाहिलेले लक्षात राहतात. तसेच एखाद्या विषयाची वारं-वार उजळणी (रिव्हिजन)केली तरी ते जास्तकाळ स्मरणात राहते. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या सर्व शाळा आणि अंगणवाड्यांना चित्र आणि मजकुराच्या माध्यमातुन बोलके करा असा संदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दि. १६ फेब्रुवारी रोजी दिला.

बहुजनांच्या न्याय हक्काच शस्त्र..! सम्राट टाईम्स

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या एकुण ७७५ शाळा आहेत. त्यावर कार्यरत मुख्याध्यापक व केंद्रप्रमुखांची एकत्रित बैठक घेण्यासाठी एकही मोठे सभागृह वाशिमात उपलब्ध नसल्यामुळे आजपर्यंत संबंधितांची बैठकच झाली नव्हती. मात्र, विद्यमान सीईओ वाघमारे यांनी सभागृहाच्या भानगडीत न पडता थेट जिल्हा परिषदेच्या प्रांगणातच ७७५ मुख्याध्यापक, ७१ केंद्रप्रमुख, ६ गटशिक्षणाधिकारी आणि १४ शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांना बसवून मॅरेथॉन बैठक घेतली. तसेच या बैठकीनंतर लगेचच ९५८ अंगणवाडी सेविका, १७ पर्यवेक्षिका आणि ६ बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्याशी जि. प. च्या सभागृहात संवाद साधला.

वाघमारे यांनी यावेळी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासंबंधी पाच महत्वाच्या मुद्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, 'जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी पंचसुत्रीचे पालन करा. सर्व शाळा आणि अंगणवाडींच्या भिंती बोलक्या करा. शाळा-अंगणवाडींच्या पूर्ण भिंती, छत, स्वच्छतागृह, वॉल कंपाऊडसह सर्व रंगवा, केवळ रंगवु नका तर संदेश आणि चित्राच्या माध्यमातुन विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण द्या.' पुढे बोलतांना सीईओ वाघमारे म्हणाले, 'येणाऱ्या जुन महिन्यापूर्वी प्रत्येक शाळेत २०० झाडांची बाग तयार करा. नविन सत्रापासुन दर २ महिन्याला विद्यार्थ्यांची मुलभूत चाचणी घेतल जाणार असुन यामाध्यमातुन मुलांच्या ६ क्षमता तपासल्या जातील. त्यातून त्यांना इंग्रजी आणि मराठी वाचता येते का? बेरीज, वजाबाकी, गुणाकार आणि भागाकार येतो का हे तपासले जाईल. महिन्यातून एकवेळ क्षमता चाचणी घेवून वर्गातील मुलांना त्या-त्या विषयात पारंगत होण्यासाठी काय करणे अपेक्षित आहे, यावर भर द्यायचा आहे. स्वतः शिक्षक व मुख्याध्यापकांनीच हे काम इमानेइतबारे करून मुलांचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी पुढाकार



घ्यावा, असे आवाहन वाघमारे यांनी केले. असाच संदेश सीईओ वाघमारे यांनी अंगणवाडी साविकांशी बोलतांना दिला. चांगले काम करणाऱ्या अंगणवाडी ताईंसाठी मी भाऊ आणि मुलासारखा वागेन पण अंगणवाडीमधील लहान मुलांना घडवतांना त्यांच्या शाररिक व बौध्दिक क्षमता वाढविण्यात हलगर्जिपणा केल्यास संबंधित अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवेतुन कमी करण्यासही मागेपुढे पाहिले जाणार नसल्याचे ते म्हणाले.

मुख्याध्यापकांच्या बैठकीला अति. मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, शिक्षण अधिकारी राजेंद्र शिंदे, उप शिक्षण अधिकारी गजानन डाबेराव यांची उपस्थिती होती. उन्हाचा पारा वाढल्याने अंगणवाडी सेविकांची बैठक जि. प. च्या वसंतराव नाईक सभागृहात घेतली. जागेअभावी अंगणवाडी सेविकांना दाटीवाटीने बसावे लागले तर काहींना उभे रहावे लागले. सुरुवातीलाच त्यांच्याशी बोलतांना साऊंड व्यवस्था आणि बैठक व्यवस्थेच्या गैरसोयी बाबत मुख्य कार्यकारी अधिकारी वाघमारे यांनी दिलगिरी व्यक्त केली. बैठकीला महिला बाल कल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे, विस्तार अधिकारी अनिल उल्हामाले , बालविकास प्रकल्प अधिकारी प्रियंका गवळी, सारिका देशमुख, पंकज ननावरे, नितीन लुंगे, अमिता गिऱ्हे यांची उपस्थिती होती.

### तुम्हाला कोण हवे, मित्र की शत्रु तुम्ही ठरवा

जिल्हा परिषदेच्या शाळेतील शाळांचा शैक्षणिक दर्जा खालावला असुन ९वी-१०वीच्या बहुतांश विद्यार्थ्यांना साधे वाचता, लिहिता देखील येत नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून हे चित्र पालटण्यासाठी शिक्षक, मुख्याध्यापकांनी आता सतर्क व्हावे; अन्यथा संबंधितांची गय केली जाणार नाही, असा इशारा जिल्हा परिषदेचे विद्यमान मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिला. जे शिक्षक व मुख्याध्यापक चांगले काम करतील त्यांच्यासाठी माझ्याएवढा चांगला मित्र कोणी नसणार आणि जे कर्तव्यात कसूर करतील त्यांच्यासाठी माझ्याएवढा शत्रु कोणी नसेल असा थेट संदेशच त्यांनी बैठकीत दिला.

आकडेवारीतील फरक खपवून घेतला जाणार नाही शिक्षक व मुख्याध्यापकांनी मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी मुलभूत चाचणी, क्षमता चाचणी घेवून तसा अहवाल पालक अधिकाऱ्यांकडे सोपवावा. शाळांना मी अचानक भेटी देवून तपासणी करेल. त्यावेळी आकडेवारीत गोंधळ किंवा फरक आढळून आल्यास ही बाब खपवून घेतली जाणार नाही, असे सीईओ वैभव वाघमारे म्हणाले.

लोकमत

# सीईओ कर्मचाऱ्यांना म्हणाले... तुम्हाला कोण हवे, मित्र की शत्रू?

## अंगणवाडी सेविका, शिक्षकांशी संवाद : चांगले काम करण्याचा सल्ला

लोकमत न्यूज नेटवर्क

**वाशिम** : जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचाविण्यासाठी चांगले काम करा, जे शिक्षक व मुख्याध्यापक चांगले काम करतील त्यांच्यासाठी चांगला मित्र कोणी नसणार आणि जे कर्तव्यात कसूर करतील, त्यांच्यासाठी माझ्याएवढा शत्रू कोणी नसेल, अशा स्पष्ट शब्दात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी शिक्षकांसमोर मित्र की शत्रू हा पर्याय ठेवला आहे. अंगणवाडी सेविकांनादेखील चांगले काम करण्याचा सल्ला सीईओंनी शुक्रवारी (दि.१६) दिला.

काही जिल्हा परिषद शाळा, अंगणवाडी केंद्रांतील परिस्थिती लक्षात घेता सीईओ वाघमारे यांनी या परिस्थितीत चांगल्या सुधारणा घडवून आणण्यासाठी 'ॲक्शन प्लान' तयार केला. शुक्रवारी सकाळच्या सत्रात मुख्याध्यापक, केंद्र प्रमुखांचा वर्ग घेतल्यानंतर सीईओंनी जिल्हा परिषदेच्या स्व. वसंतराव नाईक सभागृहात अंगणवाडी सेविका व मदतनिसांशी संवाद साधला. ते म्हणाले चांगले काम करणाऱ्या अंगणवाडी ताईसाठी मी भाऊ आणि मुलासारखा वागेन; पण अंगणवाडीमधील लहान मुलांना घडवताना, मुलांच्या शारिरिक व बौद्धिक क्षमता वाढविण्यात हलगर्जी केल्यास संबंधित अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना सेवेतुन कमी करण्यासही मागेपुढे पाहिले जाणार नसल्याचा सूचक इशाराही वैभव वाघमारे यांनी दिला. उन्हाचा पारा वाढल्याने अंगणवाडी सेविकांची बैठक जि. प. च्या सभागृहात घेतली. जागेअभावी अंगणवाडी सेविकांना दाटीवाटीने बसावे लागले तर काहींना उभे रहावे लागले. सुरुवातीलाच त्यांच्याशी बोलताना साऊंड



### काहींना धास्ती तर अनेकांकडून स्वागत

- वाशिम जिल्हा परिषदेच्या २५ वर्षांच्या कालावधीत जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख व अंगणवाडी केंद्रांच्या सर्वच कर्मचाऱ्यांशी संवाद साधून चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या उज्वल भवितव्यासाठी उत्कृष्ट कार्य करण्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणारे सीईओ म्हणून वैभव वाघमारे यांचे नाव अल्पावधीतच समोर आले.
- विद्यार्थी, स्वतःची शाळा, अंगणवाडीसाठी चांगले काम करण्याचा सल्ला देतानाच, कर्तव्यात कसूर केल्यास हयगय न करण्याचा इशारा देणाऱ्या सीईओंच्या या भूमिकेचे पालकांमधून स्वागत करण्यात आले. विद्यार्थी, शाळांसाठी चांगले काम करणाऱ्या शिक्षकांमधूनही या भूमिकेचे स्वागत होत असून, कामचुकार व कर्तव्याकडे पाठ फिरविणाऱ्या काही मंडळींने मात्र सीईओंच्या या आक्रमक पवित्र्याची धास्ती घेतल्याची चर्चा रंगत आहे.

### अचानक भेटीची शक्यता अन् कर्मचाऱ्यांकडून वेळेचे पालन

सीईओ वैभव वाघमारे यांचा यापूर्वीचा कार्यकाळ हा शिस्तप्रिय, प्रामाणिक व कर्तव्यकठोर प्रशासक म्हणून राहिला. शिक्षण, आरोग्य व रोजगारनिर्मिती या तीन प्रमुख विषयांना सर्वाधिक प्राधान्य दिल्याने, त्यांनी पहिल्या टप्प्यात शिक्षणावर लक्ष केंद्रीत केल्याचे दिसून येते. ते केव्हाही शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी केंद्राला तसेच पंचायत समिती, जिल्हा परिषदेच्या कोणत्याही विभागाला भेट देऊ शकतात, ही शक्यता लक्षात घेता बहुतांश अधिकारी, कर्मचारी हे कार्यालयीन वेळेत कार्यालयात हजर होण्याला प्राधान्य देत असल्याचे गत आठवड्यात प्रकर्षाने आढळून आले.

सिस्टीम आणि बैठक व्यवस्थेच्या गैरसोयीबाबत सीईओंनी दिलगिरी व्यक्त केली. यावेळी अंगणवाडी कर्मचारी, मदतनिस यांच्या अडीअडचणी देखील जाणून घेण्यात आल्या. अंगणवाडी केंद्र बोलके करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीला जि.प. महिला व बालकल्याण विभागाचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी संजय जोल्हे, विस्तार अधिकारी अनिल उल्हामाले , बालविकास प्रकल्प अधिकारी प्रियंका गवळी, सारिका देशमुख, पंकज ननावरे, नितीन लुंगे, अमिता गिऱ्हे यांची उपस्थिती होती. बैठकीला १५८ अंगणवाडी सेविका १७ पर्यवेक्षिकांची उपस्थिती होती